INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 6.625 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2020 Special Issue - 236 (D)

# Introspection, Prognosis and Strategy for Global Water Resources



**Guest Editor :**
Dr. Devidas S. Gejage
I/C Principal,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya,
Malshiras, Solapur, Dist. Solapur

**Executive Editors :**
Mr. Santosh P. Mane
IQAC Cordinator
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya,
Malshiras, Solapur, Dist. Solapur

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January -2020 Special Issue – 236(D)

# Introspection Prognosis and Strategy for Global Water Resources

**Guest Editor :**
Dr. Devidas S. Gejage
I/C Principal,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya,
Malshiras, Solapur, Dist. Solapur

**Executive Editors :**
Mr. Santosh P. Mane
IQAC Cordinator
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya,
Malshiras, Solapur, Dist. Solapur

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-



Scanned with OKEN Scanner

ISSN : 2348-7143
January-2020


| | | | |
|---|---|---|---|
| 34 | वार्शी तालुक्यातील तेल उद्योगाची वाटचाल | डॉ.भारत जाधव | 143 |
| 35 | वार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वाटचालीचा इतिहास | डॉ.बळीराम जाधव | 148 |
| 36 | जलव्यवस्थापन : काळाची गरज | डॉ. चांगदेव बंडगर | 159 |
| 37 | भारतातील जलसंवर्धनाचे कार्यक्रम | प्रा. अरुण कटवोळे | 164 |
| 38 | मोहोळ तालुका विकासात जलसिंचन साधनांचे योगदान | डॉ.सज्जन पवार | 169 |
| 39 | पाणी नियोजन व पाणी साठ्यातील वाढ : काळाची गरज | डॉ.के.डब्ल्यु.पावडे | 175 |
| 40 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक आणि दुष्काळ निवारण कार्य | प्रा. सुरेखा रेडेकर, कु. स्नेहा लोंढे | 179 |
| 41 | चित्रपटातून दिसणारा पाणी प्रश्न – विशेष संदर्भ पाणी | प्रा.हमीद काझी | 183 |
| 42 | सोलापूर जिल्ह्यातील पाणी प्रश्नासंबंधित शेतकरी आंदोलने | डॉ.महेश घाडगे | 188 |
| 43 | राजर्षी शाहूकालीन रुकडी | डॉ.खंडेराव शिंदे | 192 |
| 44 | स्वराज्यातील गडकिल्ल्यावरिल जलव्यवस्थापन | डॉ.कमलाकर घोलप | 197 |
| 45 | प्राचीन काळातील जलव्यवस्थापन डॉ.शिवाजी वाघमोडे | प्रा.हनुमंत तेलसंग | 202 |
| 46 | ऐतिहासिक जलव्यवस्थापन | प्रा.सुरेखा रेडेकर | 205 |
| 47 | स्वातंत्र्यसैनिक रघुनाथ रामचंद्र माने (गुरुजी) यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान | डॉ.दत्तात्रय मगर | 209 |
| 48 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जलनियोजन विषयक विचार | प्रा. रघुनाथ व्यंकटीघाडगे | 213 |
| 49 | भारतीयांचे प्राचीन काळातील जलव्यवस्थापन | डॉ.सुभाष गायकवाड | 216 |
| 50 | माळशिरस तालुक्यातील बारव स्थापत्य | डॉ.शिवाजी चौगुले | 219 |
| 51 | ऐतिहासिक काळातील पाण्याचे स्रोत,नियोजन व व्यवस्थापन | समाधान माने | 224 |
| 52 | जल व्यवस्थापनातून जागतिक अन्न सुरक्षा | डॉ.सुरेखा गोंगटे | 230 |
| 53 | पाणी फाउंडेशन:दुष्काळाविरोधात लढणारी लोकचळवळ | डॉ.सौ.एन.एस.पाटील | 235 |
| 54 | सोलापूर जिल्ह्यातील जलसिंचन क्षेत्राचा अभ्यास | प्रा.श्रीकांत पवार व प्रा.सचिन मगर | 241 |
| 55 | भूजल पुनर्भरणाची गरज | डॉ.पी.डी.मिसाळ | 244 |
| 56 | सोलापूर जिल्ह्यातील शेती क्षेत्रातील सिंचन व्यवस्था एक अभ्यास | प्रा.पी.एम.भोसले व डॉ.डॉ.एस.बागडे | 250 |
| 57 | शाश्वत विकासासाठी जलपुनर्भरण आजची गरज | डॉ. पी. एस. पांडव | 254 |
| 58 | आधुनिक मराठी साहित्यातून दिसणारा पाणी प्रश्न | डॉ.देविदास गेजगे | 260 |
| 59 | जयराम खेडेकारांच्या कवितेतील दुष्काळाची दाहकता | प्रा.जवाहर मोरे | 266 |
| 60 | | | 270 |
| 61 | समकालीन मराठी ग्रामीण कादंबरीतील पाणी प्रश्नाचे वास्तवदर्शी चित्रण | डॉ.दादाराव गुंडरे | 274 |
| 62 | पर्यावरण संवर्धनातील संतांचे योगदान | डॉ.हनुमंत माने | 278 |
| 63 | जलक्रांती, जलव्यवस्थापन व जलसाक्षरतेचे उदगाते:महात्मा ज्योतीराव फुले | डॉ.बाळासाहेब दास | 281 |
| 64 | दुष्काळजन्य परिस्थितीचे साहित्यातील चित्रण | मा.प्रा.डॉ.दत्तात्रय बारगोले | 286 |
| 65 | दुष्काळाचे व्यवस्थापन | डॉ.जनार्धन परकाळे | 291 |
| 66 | मराठी साहित्यातील सामाजिक जाणिवांच्या संदर्भात पाणी प्रश्न | डॉ.राजेंद्र खंदारे | 295 |
| 67 | मराठी कादंबरीतील दुष्काळजन्य परिस्थितीचे चि ण | डॉ.शकील शेक | 301 |
| 68 | दुष्काळग्रस्त ग्रामजीवनाचे हृदयस्पर्शी चित्रण : चारापाणी | डॉ.ए.एच.अत्तार | 306 |
| 69 | मराठी साहित्यातून अभिव्यक्त झालेली पाणी प्रश्नांची धग | डॉ.राजकुमार सोनवले | 308 |
| | जलसंधारण व पर्जन्य जलसंग्रह एक अभ्यास | प्रा.दादा यमगर व श्री.तुषार साबळे | 315 |
| 70 | पाण्याच्या व्यवस्थापनातील वैयक्तिक जबाबदारीची जाणीव | डॉ. तेजश्री रायते | 319 |




Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.625, January-2020
Special Issue 236 [D] : Introspection Prognosis and Strategy for Global Water Resources
Peer Reviewed-Referred Journal

# समकालीन मराठी ग्रामीण कादंबरीतील 'पाणी'प्रश्नाचे वास्तवदर्शी चित्रण

प्रा. डॉ. दादाराव गुंडरे
मराठी विभाग प्रमुख
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब
ता. कळंब, जि. उस्मानाबाद

साहित्य हे त्या-त्या काळाचे अपत्य असते. त्या काळातील घटना-प्रसंगाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संस्कार साहित्यातून प्रतिबिंबित होतात. 'कादंबरी' हा वाङ्मय प्रकार त्यापासून दूर राहू शकत नाही. समकालीन ग्रामजीवन, समाजवास्तव तिने अभिव्यक्त केले. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण साहित्याला उधाण आले. विशेषतः १९६० नंतर कथा, कविता तसेच कादंबरी या प्रकारातून ग्रामीण साहित्य निर्मितीस बहर प्राप्त झाला. ज्या ग्रामीण कादंबरीचे स्वरुप बहुलक्षी आहे. बदलत्या जीवन वास्तवातून साहित्य परावर्तित होते. प्रामुख्याने १९९० नंतर जागतिकीकरणाच्या काळात अनेकविध समस्यांची मूळे डोके वर काढताना दिसतात. ग्रामीण समाजाचा झालेला भ्रमनिरास, बेकारी, नापिकी, महागाई, भ्रष्टाचार, अनैतिकता, श्रमप्रतिष्ठेचे अवमूल्यन, चंगळवाद, ताणतणाव, कुटुंबाचा ऱ्हास, बाजारू संस्कृती तसेच दुष्काळ व पाणीप्रश्न यांसारख्या अनेक समस्यांनी ग्रामीण जीवन अधिक भीषण बनले. बदलत्या वर्तमान काळातील ग्रामीण माणसांच्या आयुष्यात येणाऱ्या दैन्य, दुःख, संघर्ष, नैराश्य, शोषण यांचे प्रत्ययकारी दर्शन अनेक कादंबरीकारांनी घडवले आहे. ज्यामध्ये पिराजी पाटील यांच्यापासून ते मोहन पाटील, राजन गवस, रा. रं. बोराडे, विश्वास पाटील, भारत काळे, डॉ. आनंद यादव, वासुदेव मुलाटे, बाबु बिरादार, अशोक कोळी, सुरेंद्र पाटील, शंकर सखाराम, सदानंद देशमुख, बाबाराव मुसळे, भीमराव वाघचौरे, शेषेराव मोहिते, गणेश आवटे अशा अनेक कादंबरीकारांनी प्रकाश टाकला आहे. विशेषतः 'चारापाणी', 'तहान', 'पांगिरा' या कादंबऱ्यातून पाणीप्रश्नाचे वास्तवदर्शी चित्रण येते. हेच पटवून देण्याचा हेतू या शोधनिबंधामागे आहे.

राजकारणामुळे ग्रामीण भागातील शांतता नष्ट झाली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे शेतकऱ्यांचा ओढा नगदी पिकांकडे वाढला. त्यासाठी त्याला जमीन ओलीत करणे आवश्यक वाटले. त्यातून ग्रामीण भागात अनेक प्रश्न निर्माण झाले. त्यातील एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पाण्याचा प्रश्न होय. ग्रामीण समाज जीवनाच्या शोषणाची नवी हत्यारे उदयास आली. पाणी प्रश्नाचे गंभीर स्वरुप प्रकट करण्यासाठी अत्यंत तीव्रतेने व एक नवीन जीवनदृष्टी घेऊन अनेक कादंबरीकार पुढे आले. त्यामध्ये रा. रं. बोराडे यांचा समावेश होतो.

## चारापाणी :

दुष्काळाचे चित्रण करणारी ही एक महत्त्वपूर्ण अशी रा. रं. बोराडे यांची ग्रामीण कादंबरी आहे. गुरांच्या चारापाण्याच्या प्रश्नावर आधारित आहे. भारतीय कृषीव्यवस्था ही पूर्णतः निसर्गावर अवलंबून असल्यामुळे जेंव्हा निसर्गाची अवकृपा होते तेंव्हा शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. ज्या समस्या ताणतणाव, कौटुंबिक जीवन होळपळून टाकतात. जेंव्हा पाऊस पडत नाही तेंव्हा पिके येत नाहीत. एक वेळ धान्य कोठून तरी आणता येईल पण गुरांना चारा तसेच पाणी कोठून आणावे हा प्रश्न गंभीर बनतो. कादंबरीचा नायक सुखदेव शिक्षण घेऊन गावी परत येतो. तेंव्हा गावात रोजगार नाही, गुरांना चारासुद्धा मिळत नाहीत. तसेच पिण्यासाठी पाणीही नाही. ही तत्कालीन वस्तुस्थिती अनुभवतो. एवढेच नाही तर नायकाची आई त्यास तांब्याभर पाणी पिण्यास देते. तसेच आंघोळीसाठी पाण्याचा वापर कसा करावा हेही सांगते. दोन्ही बैल विकल्याचे, गुरांना चारा तसेच पाणी नसल्याचेही त्याला कळते. सुशिक्षित सुखदेव पाण्यामुळे गावाची वाताहत होताना पाहतो. याप्रसंगी प्रशासन व्यवस्था व राजकारणाकडेही लक्ष वेधतो. गावात पाण्याचे टँकर आणून ते विहिरीत सोडले जाते, तेंव्हा पाणी मिळवण्यासाठी सर्व लोक विहिरीवर गर्दी करतात.



Scanned with OKEN Scanner

त्यातूनच अनेकांची भांडणे होतात. अशावेळी सुखदेवसारखा सुशिक्षीत तरुण पाणी प्रश्नावर बी.डी.ओ. यांना निवेदन देतो. त्यात तो म्हणतो, "आमदाराला बँकेचे चेअरमन व्हावे असे वाटते. त्यामुळे आमदार सर्वसामान्य शेतकऱ्यांना चारापाणी न पुरवता श्रीमंत शेतकऱ्यांच्या विहिरीत बोअर करून ऊसाचे क्षेत्र वाढवण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे गावातील शेतकरी हवालदिल होतात." परिस्थितीने बेजार झालेला सुखदेव शेवटी आंदोलन करतो. दुष्काळासोबत ग्रामीण माणसासमोर रोजगार तसेच जनावरांच्या चारापाण्याची व माणसांच्या अन्नपाण्याची जी समस्या निर्माण होते, या समस्येच्या अनुषंगाने जी परिस्थिती वाट्याला येते, त्यामुळे तो हतबल होतो. दुष्काळी परिस्थितीत एका सुखदेवसारख्या सुशिक्षित तरूणानं शासनाशी त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या विविध घटकांवर एक निश्चित अशी वैचारिक भूमिका घेऊन दिलेला लढा याचे चित्रण करणारी ही कादंबरी आहे.

पांगिरा :

झपाट्याने बदलत गेलेल्या खेड्याची प्रातिनिधीक कहाणी, शहरीकरणाचे परिणाम व स्थित्यंतराचे समाजनिष्ठ वर्णन करणारी विश्वास पाटील यांची 'पांगिरा' ही एक महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. अनेक प्रश्नासह पाणीप्रश्नाची नोंद ही कादंबरी घेते. एके काळी सुखी, समृद्ध, भरपूर पाणी असणाऱ्या गावावर पाण्याच्या सुयोग्य नियोजनाअभावी कसे पाणीटंचाईचे संकट उभे राहते याचे चित्रण केले आहे. पाण्याने समृद्ध असलेल्या भागात ऊसाच्या निमित्ताने पाण्याची कशी उधळपट्टी होते आणि अखेरीस सगळे पाणीच संपून गावागावात कशी भांडणे लागतात याचे चित्रण येताना दिसते. 'पांगिरा' या अस्सल ग्रामीण कादंबरीचा नायक 'पांगिरा' गावच असून पाणी टंचाईची गंभीर चर्चा या कादंबरीतून केली आहे. शर्मा नावाच्या एका कृषी संशोधकाने पाणीटंचाईचा दिलेला इशारा अधिकच महत्त्वाचा वाटतो. पाण्याचा अपव्यय झाला तर भविष्यात कोणत्या समस्येस सामोरे जावे लागेल याचे भाष्य 'पांगिरा'त केलेले आहे. "या खुळ्या समजुती आहेत. पाण्याचा असाच वापर होत राहिला तर एक दिवस असा येईल की, सारा गाव पाणी पाणी करील, माजोरी होऊ नका; पाणी जपून वापरा नाही तर काही वर्षात गावचं वाळवंट होईल, पाणी टिकणार नाही." आजही ग्रामीण भागातील पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेता 'पांगिरा' या कादंबरीच्या माध्यमातून दिलेला संदेश खुपच मोलाचा ठरतो.

तहान :

पाण्यासाठी होणाऱ्या फरफटीचे चित्रण करणारी, पाण्याची गंभीर समस्या मांडणारी सदानंद देशमुख यांची 'तहान' ही महत्त्वाची कादंबरी आहे. दुष्काळ, बेकारी तसेच पाणी हा विषय घेऊन ही कादंबरी लिहिली. मानवी जीवनाचा मुलाधार असणाऱ्या पाणी प्रश्नाभोवती केंद्रभूत होऊन पाण्यासाठी तळमळणाऱ्या ग्रामजीवनाच्या तळतळाटाची संघर्षकथा ते साकार करतात. बबन शेवाळेच्या रूपाने ग्रामीण तरुणाची मानसिकता व शोकांतिकाही प्रकट करतात. दुष्काळाची मालिका कायमच आहे. पाणी म्हणजे जीवन. दुष्काळामध्ये लोकांना पाण्याची तहान तर आहेच, त्याचबरोबर दुष्काळाचा फायदा घेऊन बैलगाडी किंवा अन्य साधनाने पाणी विकुन नोकरदार, व्यावसायिक वर्गास पाणी विकणारा एक वर्गही तयार झाला आहे. अशा पाणी विकणाऱ्यांना दुष्काळ एक पर्वणीच वाटते. बबन शेवाळे हा प्रातिनिधीक आहे. अखेरीस याची व त्याच्या बैलाचीही वाताहत होते. हे या कादंबरीतून मांडले आहे.

महामार्गाशी जोडलं गेलेलं सारंगपूर हे एक खेडेगाव. शहरी संस्कृतीचा प्रभाव, दाट छाया पडलेला बबन शेवाळे हा या गावातील सुशिक्षित बेरोजगार युवक बाजारू मूल्यावस्थेकडे, भौतिक सुखसंपन्नतेकडे अर्थात परंपरागत शेती व्यवसाय न करता लवकर तोही कमी श्रमात, कमी वेळात पैसा हाती पडणाऱ्या व्यवसायाकडे वळतो. तो पाणक्या होतो. पैसा हेच मूल्य मानणारा बबन शेवाळे शहरी संस्कृतीच्या निखालस झगमगाटात, समोरच्यांच्या मनाचा कसलाही विचार न करता, दिशाहीन तारुण्याच्या कैफात, उपभोगाच्या अत्युच्च



Scanned with OKEN Scanner

शिखरावर चढलेल्या बबनची आर्थिक कोंडी होते. या कोंडीत अडकुन शेवटी वाताहत होते. बदलत्या ग्रामीण जीवनात आजच्या तरुण पिढीची कशी कोंडी होते, कोणकोणत्या ताणतणावास सामोरे जावे लागते तसेच मूल्यसंघर्षाचे चित्रण ही कादंबरी करते.

प्रादेशिकदृष्ट्या विचार केला तरी इथून तिथून सर्व शेतकऱ्यांची अवस्था कमी-अधिक प्रमाणात सारखीच पहावयास मिळते. कारण बाजारपेठेत शेतीमालास हमीभावाचा अभाव, महागाई, नापिकी, व्यवस्थेकडून होणारा कोंडमारा यामुळे शेती व्यवसायावरील विश्वास संपत चालला आहे. त्यामुळे बबन शेवाळेसारखा सुशिक्षित तरुण परिस्थितीचा फायदा घेताना शेतीपेक्षा पाणी वाहून विकणे पसंद करतो. शेतीत राबराबुन उभ्या जीवनात जेवढे पैसे हाती येणार नाहीत त्यापेक्षा कितीतरी पैसे त्याला मिळतात. यावर प्रकाश टाकताना कादंबरीकार सदानंद देशमुख लिहितात, "शेतकरी, मजूर इकडून तिकडून रातरातभर जागू न कसंबसं पाणी आणतात. पण पोलीस, बँकेचे साहेब, शाळेचे मास्तर, दवाखान्यातले हे खरे आपले गिऱ्हाईक. तोंड बोलल्या एका पिप्याचे पाच रुपये देतात. हॉटेलवाले गिऱ्हाईक तर पह्यले मले, पह्यले मले म्हणून नंबर लावतात. खणाखण नगद पैसे आपल्या हातात देतात. सालं वावरात सालसाल कमाई करुन एवढा पैसा हातात आला नसता आपल्या. आता नेटानं अशीच कमाई करत राहायची." अशी प्रवृत्ती बळावत जाताना दिसते. या प्रवृत्तीकडे आकर्षित होताना तरूण दिसतो आहे. बबनचे वडिल राघोजी शेतात काहीतरी पेरले पाहिजे. हे अनेक वेळा सांगूनही बबन त्याकडे दुर्लक्ष करतो. पाणी विकून पैसा मिळवता येतो; हा बबनच्या मनातील विचार, अतिरेकी लालसा राघोजींना पटत नाही. राघोजी हे दुरचे विचार करणारे असतात. म्हणूनच त्यांना पाण्याचा व्यवसाय हा कायमचा वाटत नाही. ते म्हणतात, "आखर ते तकलादुच काम हाये नं, बारोमास पोसणारं वावरच कामी हाये. आपलं रोजचा खडा कामी हाये, पण एक दिवसाचा घडा कामाचा नाई." हे राघोजीचे विचार महत्त्वाचे वाटतात. कमी श्रमात अधिक पैसा मिळविणाऱ्या बबनला हे पटत नाही. त्यातून पुढे कौटुंबिक मूल्यांचा ऱ्हास झालेला समोर येतो.

पैशाच्या लालसेने, यंत्रसंस्कृती व जागतिकीकरणाने चंगळवादी बबनची मनोवृत्ती बिथरते. तसेच दुष्काळाची झळ मानवी जीवनाप्रमाणे शेती, गुरे, पशु, प्राणी यांनादेखील बसल्याचे चित्रण कादंबरीत येते. 'पाणी' हा दैनंदिन जीवनातील एक महत्त्वाचा घटक आहे. स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे उलटून गेली तरी अनेक भागात आज पाणी समस्या आहे. खेड्यात पाणीपुरवठ्याच्या योजना केवळ शासन दरबारी कागदोपत्रीच राहतात. हे पाणी मिळवण्यासाठी ग्रामीण भागातील जनतेचा वेळ, शक्ती भरपूर खर्च होते. एकीकडे पाणीटंचाईने गावकरी त्रस्त आहेत. तर दुसरीकडे पाण्यापेक्षा परदेशी शीतपेय सुखावणारी असल्याची विसंगती मांडली आहे. 'सारंगपूर' सारखे खेडेगाव, तेथील पाणीटंचाईचा प्रश्न मांडून ग्रामीण वास्तवचित्र उभे केले. पाणी नसलेल्या विहिरी अधिग्रहण करणारी भ्रष्ट शासनव्यवस्था, पाण्याच्या पातळीचा विचार न करता जलस्त्रोत निर्माण करणारे लोक, वाढती बाजारु मूल्यव्यवस्था, घराघरात पोहोचलेले जागतिकीकरण, नव्या अर्थव्यवस्थेचा शेती संस्कृतीवर झालेला परिणाम, अशा अनेक प्रवृत्ती या निमित्ताने लक्षात घेतल्या आहेत. ज्या ग्रामीण भागात दही, दुध, ताक सहज, फुकट मिळायचे त्याच ग्रामीण भागात पाण्यासाठी पैसे मोजावे लागतात. ही बाब प्रकर्षाने समोर येताना दिसते.

याशिवाय रविंद्र शोभणे यांची 'पांढर', व्यंकटेश माडगुळकरांची 'बनगरवाडी' तसेच 'शापित', 'उलट चालिला प्रवाहो' यांसारख्या कादंबऱ्या दुष्काळासोबत पाणीप्रश्नाची चर्चा करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण ठरताना दिसतात.



Scanned with OKEN Scanner

ISSN : 2348-7143
January-2020

निष्कर्ष :

कोणत्याहीं भाषेतील साहित्य, प्रकार, प्रवाह त्या-त्या काळाच्या पार्श्वभूमीवर निर्माण होते. या म्हणण्याप्रमाणे १९६० नंतर ठळकपणे 'ग्रामीण साहित्य' हा प्रवाह पुढे आला आणि त्यामध्ये मराठी ग्रामीण कादंबरीचे स्थान लक्षणीय आहे. जागतिकीकरणानंतरच्या काळात या कादंबरीने नवे वळण घेतले. ती अधिक समृद्ध होत गेली. निसर्गनिर्मित व मानवनिर्मित संकटातून ग्रामीण समाज जीवनात झपाट्याने बदल झाले. निरनिराळे प्रश्न निर्माण झाले. हे प्रखर ग्रामीण वास्तव रेखाटण्यावर कादंबरीकारांनी भर दिला. मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो किंवा पाणी म्हणजे जीवन अशा शब्दातून ज्या पाण्याचे महत्त्व विशद केले जाते. अशा 'पाणी'प्रश्नावर मराठी कादंबरीत विपूल लेखन झाले. त्यामध्ये विश्वास पाटील 'पांगिरा', रा. रं. बोराडे 'चारापाणी' तर सदानंद देशमुख यांनी 'तहान' कादंबरीत जे पाणीप्रश्नाचे समकालीन वास्तवदर्शी चित्रण केले आहे. ते महत्त्वाचे व वैविध्यपूर्ण ठरते. जीवनानुभूतीचे निराळेपण मांडणारे स्वरूप या कादंबरीचे दिसते. पाणीप्रश्नावर प्रकाश टाकणाऱ्या कादंबऱ्या वास्तवाचे दर्शन घडवताना जीवनाच्या दिशाही दाखवण्याचे काम करतात. ग्रामीण विशेषणांचा स्वीकार करत शोधकाच्या नजरेतून ग्रामीण जीवनाचा अविष्कार घडवतात. बाजारू वृत्ती, नैतिक अध:पतन, शेतकऱ्यांचे होणारे शोषण, नवशिक्षीत पिढीचा कोंडमारा यासारख्या अनेक बाबी पुढे येतात. एकुणच कादंबरीचा विचार करता ग्रामीण माणुस आणि त्याला प्रत्येक वेळी पडणारे प्रश्न यांच्याशी कादंबरीकारांची नाळ जुडलेली दिसते. कथानक, पात्र, निवेदन शैली, संवाद, बोलीभाषेतून ग्रामीण जीवनाशी ते अधिक एकरुप होतात. त्यामुळे समकालीन मराठी कादंबरीच्या बदलत्या ग्रामजीवनाचा वास्तवदर्शी शोध घेताना दिसतात.

संदर्भ :

१) डॉ. प्रल्हाद लुलेकर, 'साहित्याचे वर्तन आणि वर्तमान', साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
२) डॉ. वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा', स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, डिसेंबर २००५.
३) डॉ. शरणकुमार लिंबाळे (संपा.), 'साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००७.
४) डॉ. विश्वास पाटील, 'पांगिरा', राजहंस प्रकाशन, पुणे २००८.
५) सदानंद देशमुख, 'तहान', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९८.
६) भीमराव वाघचौरे, 'रा. रं. बोराडे यांचे साहित्य आणि आस्वाद'.



Scanned with OKEN Scanner